**अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांचे मानधन व प्रोत्साहन भत्ता अदा करण्याकरिता निधी वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०२६/प्र.क्र.६०/का.६**
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक: - ०७ एप्रिल, २०२६

**शासन निर्णय :-**

आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांच्या अधिनस्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यात येते.

२. सदर शासन निर्णयान्वये अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांचे माहे मार्च,२०२६ या महिन्याचे मानधन व प्रोत्साहन भत्ता अदा करण्याकरिता खालील विवरणपत्रातील रकाना क्रमांक-१ मधील प्रधान लेखाशीर्ष / उपशीर्ष / उद्दिष्टामध्ये रकाना क्रमांक-२ मध्ये नमूद विद्यमान तरतुदीमधून रकाना क्रमांक-३ मध्ये दर्शविल्यानुसार एकूण रुपये १७४.०० कोटी एवढा अतिरिक्त राज्य हिश्याचा आवश्यक निधी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांना वितरित व खर्च करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**(रुपये कोटीत)**

| **लेखाशिर्ष / संगणक सांकेतांक/उद्दिष्ट** | **विद्यमान तरतूद २०२५-२६** | **या आदेशान्वये वितरीत करण्यात येत असलेला निधी** |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २२३६-पोषण आहार<br>०२-पोषक अन्न व पेये यांचे वितरण<br>१०१-विशेष पोषण आहार कार्यक्रम<br>(०८) (०५) अंगणवाडी सेवा (अतिरीक्त राज्य हिस्सा १००%)<br>**(२२३६ १९४५),**<br>०२-मजूरी | १०२१.०० | १७४.०० |

३. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी वित्त विभागाने वेळोवेळी दिलेल्या सूचना विचारात घेऊन सदर निधी विहित पध्दतीने उपयोजनात कार्यवाही पूर्ण करावी.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाने अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेल्या तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४०७१०२९५५२७३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VILAS RAMDAS THAKUR

Digitally signed by VILAS RAMDAS THAKUR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=cb156fb408217396128e8dcaeed3f6fa70d9fd209eb9efc83bdd68b308614534, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C8B1E52C5C4F922AB6EB7A0B44101C838AEA34F29FBFF0AEBE9D85C3DE3468C2, cn=VILAS RAMDAS THAKUR
Date: 2026.04.07 10:59:35 +05'30'

**(वि. रा. ठाकूर)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर,

२) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई,

३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद),

४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

५) निवासी लेखापरिक्षा अधिकारी,मुंबई,

६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

७) सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास,

८) सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बाल विकास ) (जिल्हा परिषद),

९) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी ( ग्रामीण/नागरी/आदिवासी) प्रकल्प,

१०) वित्त विभाग (व्यय/६ ,अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई,

११) नियोजन विभाग (का.१४७२), मंत्रालय,मुंबई,

१२) कक्ष अधिकारी (का-४), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

१३) निवड नस्ती -का-६.